# प्रकरण दुसरे

## - निसर्ग -

मानवी मनातील निसर्गाची ओढ व आकर्षण

मानव व निसर्गातील सहसंबंध स्वरूप

निसर्ग व मानवी भावभावना

साहित्य साहित्यिक व निसर्ग

सामान्य माणसे व साहित्यिकांचा निसर्गविषयक दृष्टिकोन

निसर्ग व कवी

निसर्ग चित्रण प्रकार व मर्यादा

निसर्गाचे धार्मिक व तात्त्विक अधिष्ठान

तत्त्वज्ञान व प्रतिमा

ज्ञानेशांचा चिद्विलासवाद व निसर्ग

समारोप व निष्कर्ष



"मूलायाग्राय मध्याय
मूलमध्याग्रमूर्तये।
क्षीणाग्रमूलमध्याय
नमः पूर्णाय शंभवे॥"

## - निसर्ग -

पहिल्या प्रकरणात आपण प्रतिमेचे स्वरुप, व्याख्या इत्यादींचा विचार केला. या प्रतिमा कवी घेतात तरी कोठुन, त्याला या सुचतातच कशा, स्वत:च्याच भावसमाधीत सदैव रत असलेल्या या कवीचे प्रतिमाविश्व मोहरते, फुलते तरी कसे याचा विचार करताना कवी व मानवाचा निकटतम सहकारी.... सहचारी बनुन राहिलेल्या या निसर्गाला विसरुन चालतच नाही. मानवी जीवनात हा "निसर्ग" चिरंतन सखा, उपकारकर्ता, दाता, विधाता अशा अनेक रुपात वावरत असतो. किंबहुना मानवी जीवनाचे तो अविभाज्य अंग असतो. या निसर्गाचा व मानवाचा अन्योन्य सहसंबंध, मानवाचे निसर्गाबद्दलचे अनिवार्य आकर्षण, निसर्ग व मानवी भावना, साहित्यिक व निसर्ग, निसर्गाचे साहित्यातील प्रतिबिंब, त्याचे धार्मिक अधिष्ठान या सर्व गोष्टींचाही विचार करणे आपणास क्रमप्राप्त ठरते. किंबहुना ज्ञानेश्वरीतील निसर्गप्रतिमांचा विचार करताना निसर्ग व मानवातील या सहसंबंधाचा टप्पा ओलांडून पुढे जाताच येत नाही. निसर्ग व मानव यांचे परस्परावलंबित्व, मानवी मनातील निसर्गाची अनामिक ओढ, त्याची कारणे या सर्वांचाच विचार आपणास येथे करावा लागणार आहे.

### मानवी मनातील निसर्गाची ओढ व आकर्षण -

कोणत्याहि मनुष्याला निसर्गाबद्दल एक प्रकारची तीव्र ओढ व जबरदस्त आकर्षण असलेले आढळून येते. आळसाने जडावलेले डोळे जरासे उघडून पाहिले की दिसणारी ती सुरम्य, सुरंगी सृष्टी सौंदर्याचे असंख्य नजराणे लुटताना दिसते. उषेने पूर्वक्षितिजाचे दार नुसते किलकिले करताच आपल्या कोमल किलबिलीने तिला स्तुतीपाठ गाणारे पक्षीरुपी भाट, वसंताचे चिर-तारुण्य होऊन सदैव रंगत नि फुलत रहाणारी ती रंगबिरंगी सुमने, भव्य वृक्षाच्या कुशीत बिलगुन खुशाल विसावलेल्या त्या कुंजलता, दिवसा रात्री आकाशात साकारणारी ती विविध रंगचित्रांची गंधर्वनगरी, ती नक्षत्रांची

लुकलुकती दिव्य काव्ये, सुर्यास्त व सुर्योदयावेळी पूर्वपश्चिमेच्या दरबारात चालणारी ती मनोहर रंगनृत्ये, चंद्र व सूर्याची नित्याची मुसाफिरी अशी एक ना अनेक रमणीय दृश्ये मानवी मनाला मोहवत असतात.

वाऱ्याच्या मंद लहरींवर पदन्यास करणारी ती हिरवीगार राने, आपले तुषारमौक्तिक दुतर्फा उधळीत जाणारे निर्झर, सुर्यास्तकाळी रक्तिम रंगात रंगलेला सागर, नभोमंडळी शोभणारा इंद्रधनुचा सेतु नि आकाशाला स्पर्शिण्यास निघालेली खगांची रांग, आपले इवलेसे अस्तित्वही डोलून दाखवून देणारी ती चिमणीसी लहान फुले या सृष्टीचित्रात आपण रमत असतो. कित्येकदा या सौंदर्याचा आस्वाद घेता घेता स्वत:चे अस्तित्वही विसरून जात असतो.

गोंडस हरोणशावकांच्या खुरांनी चिन्हांकित झालेली हिरवळ, सृष्टीचे गीत गात एखादया अल्लड पोराप्रमाणे खळाळणारे अवखळ झरे, फुलांच्या सुगंधाने बहकलेले वारे, फळांनी गर्भारलेले वृक्ष, चित्रविचित्र ध्वनींची नीरव शांतता भंगवणारा तो पक्षांचा थवा, केवळ कल्पनेत हे चित्र साकारले तरी मन उल्हसित होते. आनंदित होते. मग असे नेत्रसुखदायी चित्र प्रत्यक्ष पाहिल्यावर कोणास बरे आनंद होणार नाही ?

सृष्टी सौंदर्यातुन मिळणारा हा आगळा वेगळा आनंद हा स्वानुभवाने घेण्याचा विषय आहे. साखरेची गोडी जशी स्वत: साखर खाल्याशिवाय केवळ वर्णनाने समजत नाही तद्वत या निसर्ग सुखानंदानुभुतीचे आहे. याबाबतीत रविंद्रनाथ टागोरांनी लहान मुलाचे उदाहरण दिले आहे. लहान मूल खेळणी देताच रडणे सोडून आनंदित का होते हे मोठया माणसांना समजत नाही पण तेच या आकाशातले विविधरंगी, त्या जलाशयातले सुनीळ तरंग, या फुलाफुलात केलेली रंगांची उधळण पाहताच कवीला त्या बालकाच्या निर्व्याज आनंदाचे रहस्य उमगते व तो म्हणतो, "*When I bring you coloured toys, my child, I understand why there is such a play of colours on clouds, on water, and why flowers are painted in tints when I give*

*coloured toys to you, My child."*[1]

परमेश्वराने सृष्टी निर्माण करताना कलात्मक दृष्टिने या मानवाच्या मनोरंजनाकरीता विपुल वस्तु निर्माण केल्या आहेत. विविध रुपात नटलेली ही सृष्टी, नित्य नवे शृंगार करुन सृष्टीला खुलवणारा हा निसर्ग, कित्येक प्रकारांनी आपले मनोरंजन करीत असतात. आपणास रिझवित असतात. या निसर्गाच्या चित्तहारी रुपाने खुलून जाऊन जो सुखावत नाही, चिरंतन सुखास प्राप्त करीत नाही असा माणूस विरळाच ! किंबहुना निसर्गाच्या सहवासात न सुखावणारा माणूस माणसात मोडत नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाहि.

मानवी हृदयातील निसर्गाबद्दलचे हे प्रेम प्रत्येकालाच पटण्याजोगे आहे. शहरी जीवनातील माणूस या निसर्गाच्या सहवासाला काहीसा मुकेलेला असतो. तेच तेच दैनंदिन रुटीन, तीच धडधडणारी यंत्रे, ऑफिसमधील फाईलींचा ढीग, गाडया पकडण्यासाठी चाललेली धावपळ, त्याचे सारेच आयुष्य घडयाळाच्या काटयाशी बांधलेले असते. या सा-या गोंधळात तो स्वत:चे अस्तित्वच विसरुन गेलेला असतो. अशा वेळी या सा-या गोंगाटापासून दूर कोठेतरी निवांत जाऊन बसावे असे त्याला वाटते. तशातही तो निसर्गाचा ओझरता सहवाससुध्दा गोड मानून त्यासाठी धडपडू लागतो. निसर्गाच्या सानिध्यासाठी तो धडपडू लागतो. नित्याच्या कामकाजामध्ये घुसमटलेला त्याचा जीव मन:शांतीसाठी निसर्गाचा शोध घेऊ लागतो. एखादया झाडाच्या थंडगार सावलीत निवांत बसावे, दूर कोठेतरी सहल काढावी, उंच उंच डोंगरावर चढून जावे, द-या-खो-यातली स्वच्छ हवा श्वासात भरुन घ्यावी असे त्याला वाटत असते. तरुणच काय वयोवृध्द माणसेही तीर्थयात्रेच्या निमित्ताने या निसर्गाच्या सहवासात त्याच्या निकट जाण्याचा प्रयत्न करीत असतात. शहरी जीवनात

---

१. रविंद्रनाथ टागोर - *'When and Why 'The Cresent Moon, Indian Edition - 1.29 P.18.*

घुसमटणारे असंख्य जीव या निसर्गाच्या समीप जाऊन आत्मशांती मिळवण्याचा नितांत प्रयत्न करीत असतात. आपल्या सहस्त्र करांनी निसर्ग मानवाला वैविध्यपूर्ण दान देत असतो. खंत एवढीच असते की हे दान घ्यायला कमी पडतात त्याचे दोन हात ... त्याची इवलीशी ओंजळ.

आज मानवी जीवन फारच बदलले आहे. खेडयांचेही शहरीकरण झाले आहे. आकाशात रात्री लिंबोणीच्या झाडामागे लपणारा चंद्रमा आता मात्र सिमेंटच्या जंगलातून अडखळत धडपडत वाट काढतो आहे. माणूस बदलला, काळ बदलला पण निसर्ग मात्र तोच आहे. आणि निसर्गाबद्दलचे अनामिक आकर्षण मानवी मनात कुठेतरी तग धरून आहे. कितीही शिकलेला सुटाबुटातला माणूस असूदे, कुठेतरी गवताचे पाते लवलवले तर त्याची नजर सुखावल्याशिवाय रहात नाही. अजूनही प्रभातीचे व संध्याकाळचे पूर्वपश्चिमेचे रंग त्याला भावल्यावाचून राहत नाहीत. वाऱ्याची मंद झुळूक त्याला अपूर्व स्पर्शसुख देते. तासन्‌तास फिरणाऱ्या विजेच्या पंख्याच्या कृत्रिम वाऱ्यापेक्षा त्याला पश्चिमेकडून आलेली संध्यावाताची एखादी झुळूकसुध्दा बरेच सुख देऊन जाते.

म्हणूनच माणसाला या निसर्गाची अनामिक, तीव्र ओढ सतत जाणवत असते. निसर्गाचे आगळेवेगळे आकर्षण त्याला सतत वाटत असते. अखंड कामाच्या घाईत तासन्‌तास, दिवसेंदिवस निमग्न असणारा माणूस फुरसतीचा एखादा क्षण मिळताच अवचितपणे खिडकीबाहेर डोकावतो अशा वेळी त्याला साधेसे निसर्ग-दृश्यही बरेच सुखावुन जाते. शेजारच्या घराच्या छपरावर पडलेले ऊन, झाडांच्या वाकडयातिकडया सावल्या, पडक्या भिंतीतच उगवून आलेले एखादे चिमणेसे रोपटे, घराच्या छपरावर घुमणारी पारवळाची जोडी हे सारे सारे त्याला सुंदर वाटते मनोहारी वाटते. त्याच्या मनात निसर्गाशी आगळावेगळा सुखसंवाद सुरु होतो.. पावसाचे टपोरे थेंब पंखावर झेलून थरारणारे हिरवेकंच पोपट, उन्हात चकाकणारे काळे कुळकुळीत कावळे, तुरतुरत मध्येच थबकून मागे पहात पळणारी खार, फुलांशी कानगोष्टी करणारी रंगीत फुलपाखरे या साऱ्याच गोष्टी मनमोहक असतात. माणसाचे चित्त वेधून घेणारा हा निसर्ग मानवी मनाचे आकर्षण ठरला नाही तरच नवल.

निसर्गात प्रत्येक ॠतुंच्या उलगडणा-या पायघडया प्रत्येकवेळी नवे नवे सौंदर्याचे नजराणे घेऊन येत असतात. प्रत्येक ॠतुचा फुलण्याचा बहरण्याचा एक उत्कट क्षण असतो. तो क्षण तर किती हृदयंगम असेल याची कल्पना आपणास येतेच. मंगेश पाडगावकरांनी म्हटलेच आहे, "या ओठांनी चुंबुन घ्यावी, हज्जारदा ही माती I अनंत मरणे झेलून घ्यावी इथल्या जगण्यासाठी". या निसर्गाच्या सहवासासाठी कवी तर हजार मरणे सोसावयास तयार आहेत. तुकारामांनीही "वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे" म्हणून निसर्गालाच आपले सोयरे करून टाकले आहे.

मानवी मनात निसर्गाबद्दल अशी ओढ पुरातन कालापासून दिसून येते. कालचक्राच्या बदलत्या गतीत या परिवर्तनशील जगात निसर्गाची ही ओढ मात्र कमी झाली आहे असे दिसत नाही. या काळ्या आईची, गर्द वनराईची तीच उत्कट ओढ आजही मानवी मनात तग धरून आहे. दारा-समोर बगीचा नसला तरी टीचभर खोलीतही एखादया छोटयाशा भांडयात वा बाटलीत तरारून आलेली तुळस वा एखादे रोपटे या निसर्ग प्रेमाचेच दयोतक आहे. संन्यासी असो वा प्रापंचिक, योगी असो वा भक्त, तरुण असो वा वृध्द, प्रत्येकाच्या मनात निसर्गाबद्दलचे हे प्रेम थोडयाफार प्रमाणात का होईना असतेच. लौकिक विषयात रस घेणा-या संसारमग्न माणसाला निसर्गाबद्दल प्रेम आहे यात नवल नाही. पण सर्वसंगपरित्याग करणा-या साधुसंन्याशानाही या निसर्गाचे एवढे विलक्षण प्रेम वाटावे इतकेच काय तर हा निसर्ग एखादया सोय-यासारखा वाटावा हे आश्चर्यच नव्हे काय ? इतकेच नव्हे तर अशी संसारातुन निवृत्त झालेली विरक्त माणसे एकांत शोधता शोधता निसर्गाच्या अधिकच जवळ जातात. नदीतीरावरचे तपश्चर्येचे ठिकाण, पर्वतराजी मधले वा घोर अरण्यातले आश्रम, गिरीकंदरामधल्या घळी ही तपश्चर्यास्थाने म्हणजे निसर्ग सौंदर्याची ऐन ठिकाणेच आहेत. अशी स्थाने निवडण्यात एकांताबरोबर निसर्गसौंदर्याभिरुचीचीही जाण ठेवलेली असते. थोडक्यात संसारी माणसाइतकेच विरक्त साधु संन्याशानाही निसर्गसौंदर्याचे

विलक्षण आकर्षण असल्याची प्रचीती आपणास येते. प्रवृत्ती व निवृत्ती या दोन्ही क्षेत्रात निसर्ग प्रेमाचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवते.

निसर्ग प्रेमाला जसे प्रवृत्ती, निवृत्ती, वयाचे बंधन नसते तसे स्थलकाल यांचेही बंधन नसते. ते स्थलकालातीत असते. सर्व देशात हे निसर्गप्रेम कमीअधिक प्रमाणात का होईना दिसतेच. ते कालसापेक्ष, परिवर्तनीय असले तरी ते पूर्णत:च नष्ट झाले आहे असे कधी दिसत नाही. इंग्रज असो वा भारतीय असो, प्रवृत्त असो वा निवृत्त असो, अडाणी असो वा सुशिक्षित असो सर्वांच्या ठायी निसर्ग-प्रेम असतेच असते. हे निसर्गप्रेम नसले तर मानवी जीवनच नीरस होऊन जाईल. मानवी मनातील या निसर्गाभिरुचीमुळेच सृष्टीतल्या सौंदर्याचे अस्तित्व अबाध टिकून आहे व ते चिरंतन राहिल. ज्याला सुर्योदय, सूर्यास्ताचा किरमिजी सूर्य मोहवू शकणार नाही, टिपूर चांदण्यात सुस्नात व्हावेसे वाटत नाही, खळाळत्या निर्झराकडे पाहून जो प्रसन्न होत नाही. विविधरंगी फुलांचे ताटवे पाहून ज्याचे मन फुलपाखरासम बागडण्यास प्रवृत्त होत नाही, विविध पक्ष्यांच्या कलरवाने ज्याचे कान संतृप्त होत नाहीत वा निसर्गाच्या या नि:शब्द सहवासात ज्याला आत्मशांती मिळू शकत नाही, जो आपले तनमन विसरून तिथे रमू शकत नाही अशा माणसांची आपण स्वप्नातही कल्पना करु शकत नाही. किंबहुना असा माणूस या पृथ्वीवर असेल काय असे प्रश्नचिन्ह आपणापुढे उभे राहते. अर्थात मानवी जीवन सुखदु:खात्मक व कटूप्रसंगांनी भरलेले असल्यामुळे प्रत्येकवेळी निसर्गप्रेम तितकेच तीव्र असेल असे नाही. एखादया कठिण प्रसंगी दु:खद आघातांनी व्यथित झालेला माणूस निसर्गाच्या रम्य सहवासातही आपले दु:ख विसरू शकत नाही. त्या निसर्गाशी स्वच्छ मनाने समरस होऊ शकत नाही. उलट आपल्या मन:स्थितीचे सावट, आपल्या दु:खाची दाट छाया त्या निसर्गावरच पाडण्याचा प्रयत्न करतो. बालकवींची "उदासिनता" ही कविता याचे उत्कृष्ट उदाहरण ठरेल. अर्थात दु:खाच्या प्रसंगी असे म्हणता येईल. एरवी मात्र नेहमीच्या स्थितीत असता मनुष्य निसर्गाकडे आकर्षिला गेल्याशिवाय रहात नाही. सर्वसामान्य स्थितीत असूनही एखादया माणसाला

रमणीय निसर्ग साद घालू शकत नसेल, त्याच्यावर या निसर्गसौंदर्याचा काहीच परिणाम होत नसेल तर तो माणूस नक्कीच मनोरुग्ण असला पाहिजे असे समजून त्याची काळजी घेतली पाहिजे. अशा माणसाचे आयुष्य सुखावह न ठरता ती केवळ जीवनाची विटंबनाच ठरते. सर्वसामान्य माणूस आपल्या जीवनाचे असे विराण वाळवंट होऊ देत नाही. निसर्गाबद्दलचे प्रेम हा त्याचा स्वाभाविक गुण आहे. ते माणुसकीचे गमक आहे. ही निसर्गप्रीती त्याला ओढून ताणून वा मारुन मुटकून आणावी लागत नाही. ती जन्मतःच त्याच्यात अवतीर्ण होत असते.

निसर्गातील काही विलक्षण घटनांच्या बाबतीत मानवाला एक गूढ आकर्षण वाटत आले आहे. निसर्गातील या घटनांमागे नेमके कोणते गूढ रहस्य लपले आहे, की ईश्वरी साक्षात्कार लपला आहे या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी देखिल तो निसर्गाकडे ओढला जातो. निसर्गातील या घटनांचा पाठपुरावा करुन तो त्यातून काही सत्ये, काही निष्कर्ष, काही सिध्दांत मांडतो तर कधी निसर्गाच्या या अफलातून चमत्कारापुढे आपल्या बुध्दीची हार मानतो. मानवी मनातील निसर्गाबद्दलचे आकर्षण हे त्याच्या जिवंतपणाचेच लक्षण आहे. मृत्युनंतरही हा निसर्ग मानवी देहाला आपल्यात समाविष्ट करुन घेतो. त्यामुळे निसर्गाचे अस्तित्व व त्याचे महत्त्व, मानवी जीवनातील त्याचे स्थान मान्य करावेच लागते. ते नाकारता येत नाही.

## मानव व निसर्ग यांच्यातील विविध संबंध वा नात्याचे स्वरुप -

मनुष्य हा जात्याच समुहप्रिय माणूस असल्याने तो जेथे जातो तेथे आपले संबंध अनेक प्रकारे स्थापित करतो. जसे तो माणसांशी संबंध जोडतो तसे निसर्गाशीही अनेक प्रकारातून तो संबंध जोडतो. त्याचा तो स्वभावच आहे. ज्याच्या सहवासात आला त्याच्याशी अनेक प्रकारचे संबंध निर्माण करावयाचे. निसर्गाच्या सहवासात वावरल्याने त्याचे निसर्गाशीही विविध पातळीवरुन संबंध जोडले गेले आहेत. निसर्गाचा लाभलेला प्रत्यही सहवास हे याचे मुख्य

कारण आहे. केवळ निसर्गाचा सहवासच नव्हे तर त्याच्या सौंदर्याचा उपभोग व साधनसामुग्रीचा बराच उपयोग त्याला झालेला आहे. परिणामी या दोघांच्या मध्ये वैशिष्ठ्यपूर्ण सहजीवन निर्माण झाले यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. मानव व निसर्गात हे जे सहसंबंध आहेत त्यातील काही महत्व-पूर्ण संबंधाचा विस्ताराने विचार केला तर या दोघांच्या मधील घनिष्ठता, जवळीक स्पष्ट होईल. या दोघांमधले असणारे निकट साहचर्य समजून येईल.

[अ] साहचर्याचे संबंध -

निसर्ग व मानवात सहचर सहचारी संबंध असतो. सृष्टीचा सहचर बनून मनुष्य तिच्या संपर्कात येतो. तो सृष्टीबरोबर खेळतो. तिच्या सुखदु:खात साहचर्याच्या भावनेने सहभागी होतो. सृष्टीच्या दु:खात तो भागीदार होतो. आपले अनेक उत्सव, सण निसर्गाशी संबंधीत असून आपल्या उत्सवात निसर्गाला सामील करून मनुष्य आगळाच अनुभव घेतो. अशा प्रकारे तो निसर्गाशी क्रिडाच करीत असतो. निसर्गाच्या सुखदु:खाशी समरस होताना कधी तो उमलत्या फुलांच्या मुग्ध हास्याला प्रतिसाद देतो, तर कधी चक्रवाकीच्या विरहदु:खाबद्दल सहानुभुती व्यक्त करतो. केवळ मनुष्यच नव्हे तर निसर्गही मनुष्याच्या सुखदु:खात सहभागी होताना दिसतो. कुत्र्यासारखा, गाईसम, घोडयासम पाळीव प्राणी मालकाच्या सुखदु:खात सहभागी होताना ब-याचदा दिसतो. अर्थात हे सहभागीत्व वास्तवाच्या निकषांवर घासून दाखवता आले नाही तरी कल्पनेने निश्चित दाखवता येते. विरही नायिकेच्या दु:खात सहभागी होण्यासाठी वृक्ष फुलांच्या रुपाने अश्रु ढाळतात, तर कधी शकुंतला सासरी जायला निघताच वृक्षवेली शोकाकुल होतात. कधी गुलाब रुसतो, तर कधी अंगणातली तुळस हिरमुसली होते. दु:खाच्या क्षणी पाऊस पडताच "निसर्गानेही अश्रु ढाळले" असे म्हटले जाते ते याच अर्थाने. असे काल्पनिक साहचर्य सुखद असते.

[ब] द्रष्टा-दृश्य संबंध -

निसर्गापाशी अनुपम रूपवैभव आहे. चराचरात सर्वत्र त्याच्या सौंदर्याचा साक्षात्कार विविध रूपात घडत असतो. मनुष्य हा सौंदर्याचा द्रष्टा आहे. सृष्टीतील सुंदर वस्तूंबद्दल त्याला नितांत प्रेम आहे. किंबहुना अशा वस्तुंचा तो रसिक चाहता आहे. आपले अंत:स्वास्थ व सुख तो या सौंदर्याच्या पूजनातून मिळवत असतो. नेत्र सुखद हिरवाई, नक्षत्रांकित नभोमंडल, उत्तुंग निळसर गिरीमाला, विराट रत्नाकर, पीयूषदायी चंद्रिका, पुष्पसंभारीत लतिका, किलबिलणारी चिमणपाखरे ही सारी दृश्ये म्हणजे या निसर्गाचे रूपवैभवच होय. या सौंदर्याच्या उपासनेत मानव तल्लीन होतो. आत्मभान विसरून तो त्याचा आस्वाद घेण्यात रममाण होऊन जातो. या सौंदर्याचे आस्वादन वर्षानुवर्षे केले तरी त्याचे समाधान होत नाही. रोज येणारी पहाट कालच्यापेक्षा निराळे असे काहीतरी घेऊन येत असते. उगवणारा दिवस नित्यनुतन तत्व प्रसवूनच उजडत असतो व हे नुतनत्व अनुभवण्याची अनिवार हौस या माणसात असते. व ही हौस कधी न भागणारी असते.

[क] माता-बालक संबंध -

सृष्टी ही माणसाची माताच आहे. सृष्टी आपल्या अंगाखांदयावर मानवाला एखादया बालकाप्रमाणे खेळवित असते. त्याला मोठ्या ममतेने वाढवित असते. निसर्ग आपल्या सहस्त्र करांनी मानवावर माया बरसत असतो. त्याचे लालनपालन करीत असतो. झरे, नदया, सरोवरे मानवाची तृष्णा भागवतात तर वृक्ष लता आपल्या फळांनी, धनधान्यांनी त्याची क्षुधा तृप्ती करतात. सूर्य आपल्या ज्योतीर्मयी प्रकाशाने मानवी जिवीत उजळून टाकतो. तर शीतल चंद्रमा आपल्या स्निग्धतेने मानवी मनाला शांती देतो. सृष्टीमधील हरेक वस्तु मानवाला हरक्षणी काही ना काही देत असते. "अनंत हस्ते कमलाकरांनी, देता, घेशील किती तु दो करांनी" अशी अवस्था यात

होते. सृष्टी नि:स्वार्थ असते. ती मानवाकडून कोणतीच अपेक्षा ठेवीत नाही. "निरपेक्ष दान" हा तिचा स्वभाव असतो. आई जशी मुलाची चूक पदरात घालुनही त्याला प्रेमच देते, तद्वत हा निसर्ग मानवाने कु-हाडीने तोडले, मारले तरी [त्याला अन्नच देत असतो] त्याचे कल्याण करीत असतो. मानवाला ही मातृसदृश्य सृष्टीबद्दल नितांत जिव्हाळा असतो. "खांडावया घाऊँ घाली । का लावणी जेणे केली । त्या दोघा येकि चि साउली । वृक्ष जैसा ।।" [अ. १२-१९८] असे निसर्गाचे वात्सल्य असते.

[इ] भोक्ता- भोग्य संबंध -

मनुष्य निसर्गाचा अनेक प्रकारे उपभोग घेत असतो. सृष्टीनिर्मित पाणी, अन्न, फुले, फळे या सा-यांचाच तो पुरेपूर उपयोग करून तो स्वत:चे जीवन सुखपूर्ण बनवीत असतो. सृष्टीतील काही साधनांचा उपजिवीकेसाठी, तर काही साधनांचा मनोरंजनासाठी, काही साधनांचा सजवण्यासाठी असा विविध प्रकाराने उपयोग करून तो सृष्टीच्या हरेक गोष्टीचा उपभोगी ठरत असतो. निसर्गातील प्रत्येक गोष्टीचे त्याला काही ना काही उपयोजन असतेच. अगदी नारळाच्या शेंडीपासून ते थेट आतील मऊसुत खोब-यापर्यंत, वाळक्या पाचोळ्यापासून ते थेट सकस धान्यापर्यंत प्रत्येक गोष्टी कुठे ना कुठे उपयोगी पडत असतेच.

[ई] उद्दिपक- उद्दीप्य संबंध -

निसर्ग मानवाच्या भावभावना उद्दीपीत करत असतो. वसंत ऋतु, वर्षा ऋतु माणसाच्या मनात संयोग सुखाची भावना निर्माण करतात. कोकिळ-कूजन त्याला उल्हसित करते तर एखादे गोंडस हरीण-शावक त्याची वात्सल्य-भावना जागृत करते. एखादा एकाकी बसलेला पक्षी, विराण वाळवंट, निष्पर्ण वृक्ष या गोष्टी मानवी मनातील विरह, व्यथा, एकलेपणाचे दु:ख या भावना जाग्या करीत असतात. एरवी सुरम्य वाटणारा शीतल चंद्रमा विरहकाळी

एखादया शत्रूप्रमाणे वाटतो. निसर्गाचे असे भावनोत्तेजित करणारे रुप आपणास वारंवार जाणवते. एका अर्थाने निसर्ग मानवी भावभावनात एखादया निकटवर्तियांप्रमाणे सहभागी होत असतो.

[फ] <u>शिक्षक- विदयार्थी संबंध</u> -

निसर्ग एका अर्थाने मानवाचा शिक्षकच असतो. पृथ्वीकडून क्षमाशीलता, वृक्षांकडून उदारता व परोपकार, मेघांकडून दानी वृत्ती, फुलांकडून त्याग आपण शिकत असतो. केवळ भौतिक जीवनातच नव्हे तर अध्यात्मिक क्षेत्रातही हा निसर्ग मार्गदर्शक ठरतो. वृक्ष, सरिता, समुद्र, आकाश या सर्वांचे चांगले गुण संतांनी घेतलेले दिसतात. सागराचे विशालत्व, आकाशाची व्यापक व समत्ववृत्ती, सूर्याची अलिप्तता, चंद्राची शीतल मानवता हे गुण मनुष्याला बरेच काही शिकवून जातात.

[ग] <u>प्रेरक- प्रेरित संबंध</u> -

निसर्ग मानवाच्या अनेक गोष्टींना प्रेरणादायी ठरत असतो. तत्वज्ञान, विज्ञान, भाषा या सर्वच क्षेत्रातल्या मूळ प्रेरणा निसर्गाकडूनच मानवाने घेतल्या आहेत असे दिसते. मानवी संस्कृतीच्या जडणघडणीतसुध्दा या निसर्गाचा हातभार अधिक दिसतो. मानवाने आज जी प्रगती केली आहे तिच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यात या निसर्गाचाच हातभार अधिक लागलेला दिसतो. निसर्गातील वस्तूंचे प्राथमिक ज्ञान, त्याबद्दलची सहज जिज्ञासा, अनुकरण प्रवृत्ती या सा-याच गोष्टी मानवाने निसर्गापासून घेतल्या असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

मनुष्य संस्कृतीच्या अगदी प्रारंभी अफाट, अनंत असा निसर्ग त्याच्या भोवती पसरलेला होता. या अमर्याद विस्ताराचे आकलन झाल्यावरच मनुष्याचा विकास झाला. जिज्ञासा ही त्याची सहज प्रवृत्ती असते. या जिज्ञासेतून अनुकरणाची प्रवृत्ती वाढून मानवाने आत्मविकास साधुन घेतला.

जन्मत:च माणूस हा अनुकरणशील [ *Man is an initative animal* ] प्राणी आहे असे मानले जाते. निसर्गाकडून विविध प्रेरणा घेऊन त्याने इंद्रियजन्य संवेदनांच्या सहाय्याने वस्तुज्ञान व संशोधन केले. या संशोधनामागे निसर्गाचा मोठा हात आहे हे विसरता येत नाही. न्यूटनने झाडावरून पडलेल्या फळाच्या साध्या घटनेवरून प्रेरणा घेऊन एक मोठा शोध लावला. तर बालकवींनी या निसर्गाच्या आधारेच आपली काव्यसृष्टी निर्माण केली.

मानव व निसर्ग यांच्यातील संबंधाचे हे विविध स्तर पाहिल्यानंतर आपणास निसर्ग व मानवी भावभावना यांच्यामधले नाते पहावयास हवे.

## निसर्ग व मानवी भावभावना -

मानवी भावभावनांचा व निसर्गाचा तसा घनिष्ट संबंध आहे. मानवी भावनांना उत्तेजित करून त्यांचा परिपाक एखादया कलाकृतीत करण्याचे कार्य हा निसर्ग मोठ्या उत्साहाने करीत असतो. निसर्ग भावना नुसत्या उद्दिपित करून थांबत नाही, तर त्यांचा उत्कट परिपोष करून त्यांना साकृती देण्याचे कामही तो करीत असतो. तो मानवी भावनांचा परिष्कारक असल्याने त्याच्या सान्निध्यात येताच मानवी भावना उत्तेजित होतात. निसर्गाच्या सहवासातच अनेक मानवी भावनांची निर्मिती झाल्याचे संशोधकांनी सिध्द केले आहे. भय, क्रोध, आश्चर्य, कारुण्य इत्यादी भावनांचा व निसर्गाचा जवळचा संबंध आहे.

काही मानसशास्त्रज्ञांच्या मते भयाची भावना निसर्गाच्यामुळे निर्माण होते. प्राचीन काळापासून विराट, विशाल, अनंत अशा या निसर्गाबद्दल मानवी मनात सूक्ष्मभय दडलेले आहे. निसर्गाचे रौद्र, तुफानी, वादळी रूप पाहून मानवी मनात भीती निर्माण व्हावी हे साहजिकच होते. कदाचित ते तत्कालीन अज्ञानाचे दयोतक असेल. समुद्राच्या पर्वतप्राय लाटांनी, कृष्ण मेघांच्या भयंकर गर्जनांनी, झंझावाती लाटांच्या प्रचंड आघातानी, धुवांधार

बरसणा-या मेघवर्षावानी मानवी मनात भय निर्माण झाले असेल तर त्यात नवल नाही. या नैसर्गिक आपत्तीचे भयंकर परीणाम पाहून त्या अरिष्टांबद्दल त्याच्या मनात क्रोध निर्माण झाला असला पाहिजे. क्रोधातून आक्रमक वृत्तीचा जन्म होतो व त्यातूनच संघर्षाची भावना निर्माण होते. निसर्गाच्या या रौद्र रूपाच्या बरोबरच त्याचे सौम्य, कोमल रूपही मानवाने अनुभवले असले पाहिजे. संथ वाहणा-या नदीचे निर्मळ पाणी, झुळझुळणारे निर्झर, मध्येच झुळकणारी वा-याची लहर हे त्याचे मोहक रूप पाहिले म्हणजे मानवाला विस्मय वाटतो. तो मुग्ध बनतो. त्याच्या मनात रती, हास्य, शृंगार इ. भावना निर्माण होतात. मानवाच्या परिवर्तनशील भावना हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे. तरीही मानवी भावभावनांच्या विकासाशी असलेला निसर्गाचा निकटचा संबंध नाकारता येत नाही. भावनांची अभिव्यक्ती, अनुरंजन व परिष्कार करण्याची निसर्गाची शक्ती अजूनही आपल्या अनुभवास येत असते. मानवाचा मानसिक विकास, भावनिक विकास निसर्ग योग्य प्रकारे साधतो व त्यातूनच संस्कृती फुलत जाते, घडत जाते. मानवाच्या भावनिक जीवनातून त्याचे वर्तन ठरले जाते व वर्तनाच्या योग्यतेतून धर्म, कला, तत्वज्ञान, विज्ञान यांची निर्मिती होते. त्यामुळे मानवी भावभावनातील निसर्गाचे महत्व व संबंध नाकारता येत नाही.

## साहित्य व निसर्ग -

कोणत्याहि साहित्यात निसर्गाचे चित्रण अपरिहार्य असते. किंबहुना निसर्ग हा वेगवेगळ्या कारणांनी साहित्यात येतच असतो. कधी केवळ वर्णन म्हणून तर कधी पार्श्वभूमी म्हणून, कधी केवळ सहाय्यक म्हणून तर कधी व्यक्तीरेखा म्हणून, निसर्गाचे प्रतिबिंब साहित्यात हमखास येत असते. पूर्वी काव्यात येणारा निसर्ग हा कुठल्या तरी भावनेची पार्श्वभूमी किंवा सांगड घालण्यासाठी येत असे. परंतु आजकालमात्र हा निसर्ग स्वत:चे स्वतंत्र असे अस्तित्व घेऊन साहित्यात येतो. निसर्गात घडणा-या साध्या साध्या

गोष्टींचाही उपयोग करून साहित्य सृजत असते. साहित्यातला हा निसर्गाचा प्रभाव नाकारता येत नाही. साहित्यात डोकावणारा हा निसर्ग विविध रुपे घेऊन साकारत असतो. माळावर डोलणारे साधे रानफूल-सुध्दा कवीच्या कवितेत "फुलराणी"च्या मोहक रुपात अवतरते. निसर्ग व साहित्याचा हा अन्योन्य संबंध बराच पुरातन आहे. सनातन कालापासून निसर्गाला साहित्याचे प्रमुख अंग मानले आहे व आजही साहित्यात निसर्ग-चित्रणाचे महत्व तितकेच किंबहुना पूर्वीहून अधिक आहे. प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य यात हा निसर्ग तर एक व्यक्तिरेखा बनून येतो. निसर्ग-चित्रणावरूनच साहित्याचे ग्रामीण साहित्य असे नामकरण झालेले दिसते. प्राचीन काळी देखिल या निसर्गाचीच मदत साहित्यिक लोकांनी घेऊन आले विचार सजवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, कबीर, कालिदास, भवभूती इ. प्रभृतींनी आपल्या काव्यात निसर्गाचा उपयोग इतक्या सहज सुंदर रीतीने केला आहे की त्यांचे साहित्य म्हणजे निसर्गाची सम्य निःश्वसितेच आहेत असे म्हणावे लागेल. निसर्गात काव्य आहे व काव्यात निसर्ग आहे असे जणू समीकरण बनुन गेलेले दिसते.

## साहित्यिक आणि निसर्ग -

साहित्याचे काही प्रधान विषय मानले गेले आहेत. निसर्ग व मानवाच्या घनिष्ठ जवळीकीमुळे निसर्ग हा साहित्याचा प्रधान विषय ठरतो. अतिप्राचीन कालापासून म्हणजे वेदकालापासून आजतागायत साहित्यात निसर्गचित्रण होत आले आहे. साहित्यिकाकडे निसर्ग सौंदर्याच्या राशीच्या राशी पसरलेल्या असतात. भावनाप्रधान साहित्यिक या सौंदर्याने प्रभावीत होतो. या निसर्गाला तो आपल्या साहित्याची प्रमुख प्रेरणा बनवतो. वर्डस्वर्थ, कीटस् यासारख्या कवींची प्रतिभा निसर्गाच्या सान्निध्यातच पल्लवीत होत असे. दृष्टीसमोर हिरवाईने मोहरलेला निसर्ग येताच त्यांना काव्यस्फूर्ती येऊन सुरेख गीते अवतरु लागत. अशा या साहित्यिकांचा व

12225
A

निसर्गाचा संबंध नेमका कसा असतो हे पहाणे आवश्यक ठरते. निसर्गासाठी "निसर्ग", "सृष्टी", "प्रकृती", हे तिनही शब्द एकाच व्यापक अर्थाने वापरले जातात. तथापि "सृष्टी, प्रकृति" यापेक्षा निसर्ग हा शब्द अधिक व्यापक अर्थ प्रतित करतो.

" निसर्ग निर्घृण, त्याला मुर्वत । नाही अगदी पहा कशाची "

तुतारी कवितेत केशवसुतांनी लिहिलेल्या या ओळीतला "निसर्ग" हा शब्द "जग" या व्यापक अर्थी वापरलेला दिसतो. हिंदीमध्ये निसर्गाला प्रकृती म्हणून संबोधले जाते. बरेच साहित्यिकही निसर्गाला "प्रकृती" म्हणूनच संबोधतात. इंग्रजीतील *Nature* हिंदीतील "प्रकृती" व मराठीतील "निसर्ग" हे जवळ जवळ सारख्याच व्यापकार्थाचे सूचन करतात. अर्थात एखादा तत्वज्ञानी, एखादा वैज्ञानिक, एखादा विचारवंत, एखादा धर्मनिष्ठ निसर्ग शब्दाचा अर्थ आपापल्या दृष्टीने वेगवेगळाच सांगेल. तथापि साहित्यिकांना अपेक्षित असणारा अर्थ हे लोक सांगतीलच असे नाही. साहित्यिकांच्या दृष्टिकोनातून या शब्दाला वेगळीच अर्थपूर्णता लागेल.

साहित्यातील "निसर्ग" या शब्दाचा अर्थ पाहू जाता त्यात "मानवेतर" सर्व सृष्टीचा समावेश होतो. शरीरधारी मानव सोडून सर्व सचेतन- अचेतन सृष्टी "निसर्ग" या संज्ञेत समाविष्ट होते. सामान्य माणूसही असेच काहीसे गृहीत धरून असतो. मनुष्य या विश्वाच्या उभारणीतला महत्त्वाचा दुवा असला तरी त्याला या उभारणीच्या साखळीबाहेरही एक स्वतंत्र अस्तित्व आहे असे त्याला वाटत असते. या निसर्गाशी एकरुप होऊनही आपण त्याहून वेगळे आहोत असे त्याला वाटत राहते. कारण त्याच्या घडणीत व संस्कारात निसर्गाचा मोठा वाटा आहे हे त्याला विसरता येत नाही. आपले बौध्दिक सामर्थ्य व चैतन्याची जाणीव यामुळे तो स्वत:ला वेगळे समजत असतो. मानव व मानवेतर जग असे दोन भेद कल्पून मानवेतर, सचेतन- अचेतन जग हा अर्थ तो "निसर्ग" शब्दातून काढतो. तथापि साहित्यातील निसर्गात सर्वच्या सर्व "सचेतन- अचेतन" जग येतेच असे नाही. निसर्गातील आकाश, ग्रह, तारे, मेघ,

वायू, पर्वत, सागर, नदया, सरोवरे, अरण्ये, उदयाने इत्यादी विविध दृष्यांचा मानवी मनावर जो सामुदायिक संस्कार घडतो त्यामुळेच या समवायाचे पर्यवसानी वर्णन करण्याची इच्छा कवीला होते. अशा वर्णनाला [*Land Scapes* ] प्रकृतिवर्णन, निसर्गवर्णन असे म्हटले जाते.[१] आपल्या स्वाभाविक सौंदर्याने मनुष्याला आकर्षून घेणा-या मानवेतर जगातील सर्व वस्तू म्हणजे "साहित्यिक निसर्ग" असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या सहजसौंदर्याने ज्या वस्तू मानवाला आकर्षून घेतात व अशाच निसर्गाचा साहित्यात विचार केला जातो.

## सामान्य माणसे व साहित्यिकांचा निसर्गाकडे पाहण्याचा विभिन्न दृष्टिकोन -

मानवापुढे निसर्ग आपल्या सौंदर्याचे भांडार उघडून बसलेला असतो. नदया, पर्वत, सूर्योदय, सूर्यास्ताचा बदलता रंगमंच, सरोवरे, मेघ, आकाश अशा कित्येक सुंदर वस्तू त्यांच्या दृष्टिपुढे पसरलेल्या असतात. यामुळे मिळणारा आनंद सर्वच अनुभवत असतात. दिवसभराच्या धावपळीतून सामान्य माणूसदेखिल चार-दोन घटका या निसर्गाच्या सहवासात घालवित असतो. टिपूर चांदण्यात मनसोक्त फिरावे, अल्लडपणे खळाळणा-या, बागडणा-या झ-याचे फेसाळते वैभव अनुभवावे, रान पाखरांचे मोहक संगीत ऐकून कान तृप्त करावे असे सर्वांनाच वाटत असते. सामान्य व साहित्यिक दोघेही निसर्गाचा आस्वाद लुटत असतात. पण या दोघांच्या त्याच्याकडे पाहण्याच्या दृष्टीत महदंतर असते. साहित्यिक आपल्या प्रतिमेच्या चष्म्यातून निसर्गाकडे पहात

---

१. हुपरीकर ग. श्री. - श्री ज्ञानेश्वर दर्शन - तत्वज्ञ कवी श्रीज्ञानेश्वर - भाग १ - पान २८५.

असतो. त्याची काव्यात्म दृष्टी, संवेदनक्षमता, तरल कल्पनाशक्ती, सूक्ष्म निरीक्षणशक्ती सामान्य माणसात दिसत नाही. सामान्य माणसाच्या लक्षात ज्या गोष्टी येत नाहीत, ज्या तरल संवेदना त्याला जाणवत नाहीत त्या साहित्यिकाला मात्र लीलया जाणवतात. त्यामुळेच साहि- त्यिकाने रंगवलेले निसर्गदृश्य साधे असले तरी वेधक बनते. म्हणून साहित्यगत निसर्गचित्रण वाचून वाचक आनंद मिळवत असतात. प्रत्यक्ष निसर्गसौंदर्यातही आनंद असतोच पण साहित्यगत निसर्गसौंदर्यात साहित्यिकाच्या जादूई लेखणीचा स्पर्श झाल्याने त्यातील आनंद अनेक पटींनी वाढलेला असतो.

अर्थात प्रत्येक माणसाला परमेश्वराने प्रतिभेची देणगी दिलेली असतेच. कल्पकता व विचारशक्ती प्रत्येकाजवळ असतेच. परंतु त्याचे प्रमाण मात्र साहित्यिक व सामान्य माणसात कमीजास्त असते. साहित्यिकाला कल्पकता, प्रतिभा तीव्र स्वरूपात असतात. सामान्य माणसात त्या सौम्य असतात. सामान्य माणसात या गोष्टी नसल्याच तर साहित्यिक व त्याच्यात सुसंवाद साधलाच नसता. थोडक्यात सामान्य माणूस केवळ रंजनासाठी निसर्गाकडे पहात असतो तर साहित्यिक सृजनाचे साधन म्हणून निसर्गाकडे पहात असतो. त्यातूनच त्याला कलाकृतीची निर्मिती करावयाची असते.

सामान्य माणसाप्रमाणे शास्त्रज्ञ, तत्वज्ञ व साहित्यिक यांच्याही निसर्गविषयक दृष्टिकोनात असेच अंतर असते. तत्वज्ञ बुध्दी व तर्क यांच्या सहाय्याने तत्वसंशोधन करीत असतात तर साहित्यिक कल्पना व भावनेच्या आधारे सौंदर्यचित्रण करीत असतात. तत्वज्ञाची निसर्गाची कल्पना व्यापक असते तर साहित्यिक त्यातील रसात्मकतेशी संबंधित असतो. शास्त्रज्ञ बुध्दीच्या जोरावर नवे तत्व शोधतो तर साहित्यिक कल्पकतेच्या जोरावर नवी कलाकृती प्रसवतो. एक बौध्दिक तर दुसरी सृजनात्मक प्रक्रिया आहे. त्यामुळेच साहित्यात ज्ञान व तर्कापेक्षा भावना व अभिरुचीस प्राधान्य दिले जाते. अर्थात दोघांची भूमिका सत्यसंशोधकाची असते. दोघांनाही बुध्दीचा

व कल्पकतेचा वापर करावा लागतोच. फक्त तत्वज्ञ बुध्दीवर व साहित्यिक कल्पनेवर अधिक भर देत असतो, इतकेच. अर्थात तत्वज्ञ आपल्या तत्वावरच जोर देऊन हटवादीपणा करु लागला तर त्यात काव्य उरणार नाही. हीच गोष्ट कवीची. कविलाही काव्याची तात्त्विक बैठक झुगारुन चालत नाही.

शास्त्रज्ञ निसर्गाला जडत्व देऊन त्यावर संशोधन करतो. साहित्यिक मात्र या निसर्गाला मानव्यत्व देऊन, स्वतंत्र व्यक्तित्व देऊन त्याच्याशी आंतरिक संबंध स्थापतो. इंद्रधनुष्य पाहून त्याचे मन वेडावते. निर्झराबरोबर मुक्त मनाने तोही खळखळू लागतो. मेघांबरोबर प्रियतमेला संदेश पाठवण्या-इतपत तो त्याला जवळचा वाटतो.

तत्वज्ञ, वैज्ञानिक व साहित्यिक यांच्या निसर्गाकडे पाहण्याच्या या विभिन्न दृष्टी पाहिल्या की साहित्यिकाच्या नजरेतील निसर्गाचे वेगळेपण झटकन ध्यानात येते.

## <u>निसर्ग व कवी</u> -

"जे न देखे रवी, ते देखे कवी" या उक्तीनुसार कवी व निसर्गाचे नाते एका वेगळ्याच पातळीवरचे असते. हे समजून येते. कवी अत्यंत संवेदनाशील मनाचा असतो. निसर्गाच्या साध्या गोष्टीतही त्याला मोठा आशय सापडत असतो. "साध्याही विषयात आशय मोठा किती आढळे" या केशवसुतांच्या उक्तीप्रमाणे तो सामान्यातही असामान्यत्व शोधीत असतो. निसर्ग हा तर त्याचा जिवलग सखा असतो. माळावरचे एखादे रानफूल पाहून त्यांना हिरवळीवर बागडणाऱ्या उपवर फुलराणीची आठवण येते तर कधी मिटलेल्या फुलाला पाकळी उघडून जगाकडे पाहण्यास ते सांगतात. निसर्गाच्या सहवासात ते आपले काव्य फुलवत असतात. किंबहुना निसर्ग हाच त्याच्या काव्यामागील प्रमुख प्रेरणा असतो. कधी हा निसर्ग त्याचा सखा बनून, कधी आप्त बनुन, कधी प्रतिभाशक्ती बनुन, कधी स्फूर्ती बनुन काव्यात येत असतो.

"क्षणात नाहिसे होणारे दिव्य भास" कवीला या निसर्गाच्या सान्निध्यातच होत असतात. निसर्गाच्या सहवासातले हे फुलपाखरी क्षण शब्दात बध्द होताच त्यांना सुंदर कवितेचे रुप लाभत असते. रोजच्या धक्काधकीच्या जीवनातून पळ काढून हा कवी निसर्गाच्या सान्निध्यातच एकांत शोधत असतो. आपल्या प्रतिभेच्या दिव्य रुपाचा साक्षात्कार त्याला याच निसर्गाच्या सहवासात घडत असतो. तेथे त्याला व्यावहारिक जगाची कर्कश हाक जाणवु शकत नाही. त्याच्या भावसमाधीत या लौकिक जगाची लुडबुड चालत नाही. आपल्याच कल्पना विश्वात रममाण होऊन तो समाधीत रत झालेला असतो. निसर्गातील असंख्य रमणीय दृश्ये पाहून तो भारावून जातो. त्याच्याबरोबर एक आगळेच भावनिक नाते प्रस्थापित करतो. आपल्या भावभावनांचा आरोप त्याच्यावर करुन त्यालाही आपल्यासारखेच मानवी रुप देतो. या भावनिक, आंतरिक तादात्म्यातूनच त्याची काव्यरती साकारत असते. अत्यंत रसिक दृष्टिकोनातून तो निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेत असतो. यातून जाणवलेल्या नवनव्या भावानुभुतीचा उत्सव साजरा करीत असतो. निसर्गाचा प्रत्येक ऋतु त्याच्यासमोर एक जिवंत काव्य म्हणून साकारत असतो. या अनुभवास साकाररुप देण्याचे, साकारण्याचे महत्त्वाचे कार्य कवी करीत असतो.

कवी हा शब्दांचा ईश्वर असतो. विश्वामित्राच्या प्रतिस्वर्गाप्रमाणे कवीही आपल्या शब्दसामर्थ्यांनी, कल्पनाशक्तीने स्वतंत्र प्रतिमासृष्टी निर्माण करीत असतो. या सृष्टीतील प्रतिमांच्या आधारे तो एक नवी आगळीवेगळी प्रतिमासृष्टी स्थापत असतो. म्हणूनच कवीच्या दृष्टीने निसर्गाचे महत्त्व अधिक असते. या निसर्गापासून अनेकदा तो स्फूर्ती घेत असतो. निसर्ग ही त्याची प्रेरणा असते. कल्पना हे त्याचे भांडवल व यातूनच कवितेचा जन्मोत्सव घडत असतो. सामान्य माणूस पाने, फुले, वृक्ष, वेली पाहून गप्प बसेल. फार तर फळांचा उपयोग खाण्यासाठी करेल. पण कवी मात्र या वृक्षवेलींशी एक भावनिक नाते निर्माण करुन त्यांना आपल्या सुखदु:खात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करेल. इतकेच नव्हे तर मानवी भावभावनांचे आरोपण त्यांच्यावर करुन

त्यांनाही मानवाप्रमाणे भावभावना आहेत, कोमल अंत:करण आहे हे सिध्द करून दाखविण्याचा प्रयत्न करेल. शकुंतला सासरी जाताना वृक्षवेलींनी फुलांच्या रुपाने अश्रु ढाळले. हरीणांनी, पशुपक्ष्यांनी अन्नपाणी सोडले. या प्रसंगात प्रत्यक्ष निसर्गाशी शकुंतलेच्या भावनेशी एकरुप झालेला दिसतो. ही किमया केवळ कवीलाच येत असते. निसर्गातील नित्य घडणा-या घटनांना कवीच्या वाणीचा स्पर्श होताच त्यातून एक सुंदर भावगीत निर्माण होते. बालकवींची "अरुण"सारखी कविता याचे सुंदर उदाहरण ठरते. ज्ञानेश्वरांचे निसर्ग दृष्टांत तर निसर्गाला अध्यात्म पातळीवर नेऊन पोहोचवतात. म्हणूनच कवी व निसर्गाचे हे सहसंबंध, सान्निध्य, सहवास शब्दात वर्णन्याजोगा नसतो. निसर्गाच्या सुंदर रुपाचाच आस्वाद सामान्य माणूस घेतो. पण कवी मात्र त्याच्या सुंदर व कुरुप या दोन्ही रुपांचा आस्वाद तितक्याच उत्कटपणे घेत असतो. निसर्गाच्या कुरुपतेबद्दल, त्याच्या भयाण रुपाबद्दल आकर्षण असणारे देखिल काही कवी आहेत. पाश्च्यात्य कवी बायरन निसर्गाच्या भयाण, विराट रुपाचेच चित्रण अधिक करतो. तो म्हणतो, *"O that the desert were my dwelling place".* या कुरुपतेला कवीच्या वाणी स्पर्शाने सौंदर्य प्राप्त होते. कवी लौकिक सृष्टीतील विनाशी सौंदर्याला अविनाशी रुप देत असतो. आदर्शभुत वस्तुंची न भागणारी भूक प्रतिभेच्या सहाय्याने भागवणे हे काव्याचे प्रमुख कार्यच असते.[१] एकंदरीत कवी निसर्गातील सुरुप, कुरुप गोष्टीचे काव्यमय चित्रण करून त्या सौंदर्याला शब्दांचे रुप देत असतो.

## निसर्ग चित्रणाच्या मर्यादा -

काव्यातील निसर्गचित्रण अपरिहार्य असते असे म्हटले तरी त्याच्याही चित्रणाला काही मर्यादा पडतातच. ब-याचदा कवितेत त्याच त्याच निसर्ग-

---

१. द. के. केळकर - "काव्यालोचन" - पृष्ठ २८२.

वर्णनांची पुनरावृत्ती झालेली दिसते. चंद्र, सूर्य, तारे, आकाश हे कवितेतले कायमचेच घटक होऊन गेलेले असतात. हरक्षणाला निसर्ग नवे रुप धारण करीत असतो. तो परिवर्तनीय असतो. ऋतुपरत्वे त्याचे रुप बदलत असते. अगणित रंग, गंध, ध्वनी यांच्या असंख्य छटा निसर्गात असतात. काव्याचा विषय या दृष्टिने निसर्ग अमर्याद आहे. सामान्यांच्या स्थूल दृष्टिला तो मर्यादित वाटला तरी त्याची मर्यादा एवढी त्रोटक नाही. त्याच्या या वैविध्यपूर्ण रुपापुढे कित्येकदा कवीची प्रतिभाच तोकडी पडताना दिसते. निसर्गवर्णनात तोचतोचपणा येतो. तरीही काव्यातील निसर्ग-चित्रणाचे महत्त्व कमी लेखता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

प्राचीन काळी संत काव्यापासून पंत काव्यापर्यंत सूक्ष्म दृष्टिने पाहिल्यास निसर्गचित्रणाच्या मर्यादा लगेच लक्षात येतात. बहुतेक संत कवींनी दृष्टांतासाठी चंद्र, सूर्य, नदी, वृक्ष, आकाश, समुद्र, पृथ्वी याच गोष्टींचा वारंवार वापर केलेला दिसतो. ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर, तुकाराम या सा-यांच्याच लेखनात, दृष्टांतात, निसर्गातील त्याच त्याच गोष्टींची पुनरावृत्ती झालेली दिसते. पंडिती कवींनीही चंद्र, चांदण्या, चकोर, वसुधा याच निसर्ग प्रतिमांचाच वापर करुन आपले काव्य सजवले. शाहिरी कवींनी निसर्गाचा वापर करताना तेच दृष्टांत थोडयाफार फरकाने स्वीकारले. आधुनिक कवींनीही आपल्या काव्यात निसर्गवर्णन करतांना निसर्गातील त्याच प्रतिकांचा, प्रतिमांचा वापर केलेला दिसतो. सरिता - सागर, चक्रवाक- चक्रवाकी, धरती- अंबर, कमल- भृंग, चंद्र- कुमुदिनी याच याच उपमा कवितेत वारंवार येताना दिसतात. ज्युलियनांचा "डोह" मात्र थोडे वेगळेपण जाणवून देतो. बालकवींचा "औदुंबर"ही अशीच वेगळी वाट अवलंबतो. तथापि या पुनरावृत्तीला निसर्गचित्रणाच्या मर्यादा म्हणाव्या की नाही याबद्दल साशंकता निर्माण होते. कारण सर्वच अभ्यासकांना ही पुनरावृत्ती "मर्यादा" वाटेल असे नाही.

## निसर्गचित्रणाचे प्रकार -

काव्यात निसर्गचित्रण येते ते विविध प्रकारांनी. त्यामुळेच साहित्यात वैविध्य निर्माण होण्यास मदत होते. "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने प्रत्येक साहित्यिक आपापल्या दृष्टिनुसार निसर्गाचे भिन्नभिन्न रुपात चित्रण करीत असतो. अर्थात या वैविध्याकडे समिक्षकांनी म्हणावे तितक्या बारकाईने पाहिलेले नाही. रा. श्री. जोगांनी मात्र यथातथ्य सृष्टीवर्णन, रुपकात्मक, कल्पनाप्रधान, मानवीकरणरुप, तत्वज्ञान प्रतिपादनरुप असे सृष्टीवर्णनाचे विविध प्रकार सांगितले आहेत.[१] काव्यात निसर्गाचा वापर कधी केवळ काव्यासाठी म्हणून, कधी सौंदर्याची ऐंद्रिय प्रतिती देण्यासाठी म्हणून, कधी पार्श्वभूमी म्हणून, कधी साम्यविरोध दर्शक म्हणून केला जातो. डॉ. वाटवे यांनी या संदर्भात बरेच विवेचन केले आहे. ते प्रामुख्याने निसर्गाचे आलंबन, पृष्ठभूमी, अलंकरण व उद्दिपन हे चार उपयोजन प्रकार सांगतात.[२] हिंदी साहित्यात तर निसर्गाचा उपयोग आलंबन, उद्दिपन, अलंकार, मानवीकरण, उपदेश, पृष्ठभूमी व वातावरण निर्मिती, प्रतिक या आठ प्रकारांनी केला जातो असे सांगितले आहे.[3] निसर्गचित्रणाच्या वर्गीकरणाचा प्रश्न म्हणावा तितका सोपा नाही. तरीही त्यातील सर्वानुमते मान्य झालेल्या काही प्रकारांचा थोडक्यात आढावा आपणास घेता येईल.

### [१] साध्यरुप निसर्गचित्रण -

यालाच काव्यशास्त्रीय भाषेत आलंबनरुप निसर्गचित्रण असे म्हणतात. कवी मनातील भावनेचे आलंबन बनुन यात निसर्ग येतो. त्यामुळे कवी मनात

---

१. रा. श्री. जोग - "केशवसुत" - पान १६७.

२. के. ना. वाटवे - "संस्कृत नाटय सौंदर्य" - पान २५१.

३. किरणकुमारी गुप्ता - हिंदी काव्यमें प्रकृतीचित्रण - पान २६.

अनेक भावलहरी निर्माण होऊन त्यातुन सुंदर निसर्गकाव्य बनते. याचे दोन उपप्रकार पडतात.

अ] स्वाभाविक निसर्गचित्रण - यात निसर्गाच्या सहज, साध्या, रुपाची अभिव्यक्ती असते. यात कुठे भावनांचा निसर्गावर आरोप केलेला नसतो. कुठे उपदेश केलेला नसतो की आध्यात्मिक विचार सूचित केलेले नसतात. कवी निसर्गाच्या सहज सौंदर्याने तल्लीन होऊन जातो. त्याच्या विविधरंगी, बहुरुपी अनंत ध्वनीरुपाने तो अनुभुतीशील बनतो व तेच रुप काव्यबध्द करण्याचा प्रयत्न करतो. त्यात येणा-या तल्लीनतेमुळे निसर्गाची गती, वर्ण वाद, गंध यांची सूक्ष्मचित्रे अशा निसर्ग कवितात आढळतात.

ब] चेतनीकृत निसर्गचित्रण - यात निसर्गाकडे मानवी दृष्टिकोनातून पाहिले जाते. त्याच्यावर चैतन्याचा आरोप केला जातो. मानव निसर्गाचाच एक अंश आहे. भावुक कविचे निसर्गाशी अनेक कारणांनी नाते जुळते. त्याच्याशी कवीचे मानसिक तादात्म्य होते. कवी निसर्गावर मानवी चैतन्याचा, क्रिडा व्यापाराचा, मानवी आकाराचा आरोप करतो. त्याच्यात चैतन्य व भावभावना पाहू लागतो. अशा प्रकारे निसर्ग व मानवी जीवन एकाच पातळीवर येतात. निसर्गात प्रतिस्पंदन दिसू लागते. या आरोपित निसर्ग-चित्रणात मानसिक प्रतिबिंबाच्या रुपाने निसर्गभावाचे आलंबन करतो, निसर्गातील संचलनात या आरोपाने सजीवता, प्राणवत्ता येते. मग प्रभातकाली पूर्व दिशेने शृंगार केल्याचा आभास होतो, वाहणा-या नदीत विकलता दिसून येते, फुला-फुलात मोद दिसून येतो. याहीपुढे जाऊन कवीला निसर्गात मानवी क्रिया-व्यापार दिसू लागतो. "फुलराणी"त त्याला उपवर बालिका दिसू लागते. सरिता सागराच्या ओढीने प्रियतमा बनुन धावू लागते. पर्जन्याच्या पहिल्या वहिल्या स्पर्शाने पृथ्वी रोमांचित होते. वृक्षलता यांच्यात पतिपत्नीचा संबंध जुळतो. असे मानवी संबंध निसर्गात आढळू लागतात. एवढेच नव्हे तर कवीचे स्वत:चेच मानवी संबंधात निसर्गाशी नाते जुळते. निसर्ग त्याचा मित्र बनतो, कधी माता बनतो तर कधी त्याच्या प्रियतमेच्या रुपात अवतरतो.

आपण सुखी असता निसर्गातही आनंद दिसतो. उदा. बालकवींची "आनंदी आनंद गडे" ही कविता, व आपण शोकमग्न असतो तेव्हा निसर्गही दु:खाने भरलेला असतो. उदा. बालकवींचीच "उदासिनता" ही कविता. या प्रकारामुळे निसर्ग कवितेमध्ये नाविन्य निर्माण होण्यास मदत होते हे मात्र निश्चित.

[२] उपदेशरूप निसर्गचित्रण -

कधी कधी एखादा भावुक कवी चिंतनशील बनतो. अशावेळी हा निसर्ग आपल्याला काही तरी उपदेश करतो आहे असे त्याला वाटू लागते. निसर्गाच्या अन्य भुमिका गौण ठरून उपदेशकाची भुमिका सरस ठरते. अशा प्रकारचे निसर्गरुप आपणास वर्डस्वर्थच्या कवितेत अधिक आढळते. संतकाव्या-मध्येही निसर्ग कित्येकदा उपदेशकाचे रुप घेऊन येतो. अनेक बाबतीत निसर्ग हा आपला गुरु ठरतो. त्याच्यापाशी मानवाने घ्यावीत अशी अनेक आदर्शभुत तत्वे आहेत. पृथ्वीची क्षमाशीलता, वृक्षांचे परोपकारित्व व त्याग, सागराची विशालता, आकाशाची समत्वदृष्टी अशी अनेक उदाहरणे घेता येतील. भागवतात उपदेशाचे माध्यम म्हणून निसर्गाचा वापर केला आहे.

वरील दोन्ही प्रकारात निसर्ग कवीला व्यक्त रुपात आकर्षित करतो. त्याच्याशी तद्रुप होतो. कविहृदयातील संपूर्ण उल्लास अशा कवितेत दिसून येतो. यासाठी सूक्ष्म निरीक्षण व प्रत्यक्षानुभुतीची गरज असते. निसर्गाचे सूक्ष्म व्यापार यात दिसतात.

[३] साधनरुप निसर्गचित्रण -

यात कवीचा वा एखादया पात्राचा निसर्गचित्रणात अप्रत्यक्ष संबंध असतो. निसर्ग येथे दुसऱ्या भावभावनांच्या अंगभूत स्वरुपात येतो. याचे उद्दिपनविभाव, पृष्ठभूमी व अलंकरण असे प्रकार पडतात.

अ] उद्दिपनविभाव - शृंगाररसात याला अधिक स्थान असते. या रुपात निसर्ग संबंधित भाव दोन रुपांनी उद्दिपीत करतो. - संयोगकाली नायक-नायिकाच्या मिलनाची भावना तो उद्दिपीत करतो. -- विरह कालात विरही जनांची व्याकुळता वाढवून तो त्यांचा रतिभाव पुष्ट करतो.

संयोगाचे वेळी प्रेमी फुलांमध्ये, पक्ष्यांच्या जोडप्यामध्ये, वृक्षवेलीमध्ये पारंपारिक आकर्षणाचा अनुभव घेतात. कोकिळेच्या गायनाने त्यांच्या हृदयातील प्रेम द्विगुणीत होते. वसंताच्या सौंदर्याने मिलनाला एक मादकता प्राप्त होते. निसर्गातील मनोहर वातावरण असे प्रेमाची माधुरी अधिकच वाढवते. यातील निसर्गचित्रणाची एक प्रवृत्ती दिसते. ती म्हणजे संयोगाच्या काली निसर्ग मधुर वाटतो, तर वियोगाच्या वेळी तो कष्टप्रद वाटतो. साहित्यात उद्दिपन विभावरुप निसर्गचित्रणाची अभिव्यक्ती अगदी स्वाभाविक आहे. निसर्ग आणि मानव यांचे घनिष्ठ साहचर्य हे त्याचे कारण आहे.

ब] पृष्ठभूमी किंवा वातावरण - निसर्गाचा उपयोग कधी कधी पृष्ठभूमी म्हणून केला जातो. विशेषत: कथात्मकप्रधान साहित्यात हे रुप दिसते. अशा वर्णनाने पुढील घटनास्थितीची व्यंजना होते. साहित्यात पृष्ठभूमी रुपाने निसर्गाचे चित्रण झाले आहे. त्यात अनेक स्थळी कवीचे तादात्म्य आणि निसर्गाशी आढळून येते. म्हणूनच अशी चित्रणे आलंबनात्मक मानतात. हे चित्रण काव्यवस्तूचा परिचय करून देते व पुढील घटनांची भावात्मकता निर्माण करते. यात मानव व निसर्ग यांच्यात साम्य किंवा वैषम्य दर्शन हे केले जाते. यात निसर्ग कधी मानवी मन:स्थितीशी समान असतो, तर कधी तटस्थ, पृष्ठभूमीरुप निसर्गवर्णना प्रमाणे वातावरण निर्मिती हे देखिल कथावस्तूचे अपरिहार्य अंग असते. पात्रांची मनोधारणा व कार्यव्यापार पूर्णत: यावरच अवलंबून असतो. हे चित्रण मानवी जीवनास आकार देणारे असते. हे जीवन कथांतर्गत पात्रांचे जिवीतसत्त्व असते.

क] अलंकरणरुप चित्रण - "अलंकार" या शब्दाचा अर्थच मुळी "सौंदर्य"

असा घेतला गेलेला दिसतो. वामनाने "सौंदर्य" तर दण्डीने "काव्यशोभाकरधर्म" असे म्हटले. अलंकार साहित्याचे एक आवश्यक अंग आहे. त्यात सौंदर्यभावनेची अभिव्यक्ती दिसते. मानवी जीवनातील घटना, परिस्थिती व व्यक्तीविशेषांना निसर्गात साद्दृश्य शोधणे हा उपमादी अलंकाराचा प्रमुख भाग असतो. निसर्गाचा विशाल प्रांत अलंकारासाठी खुला असता त्यात तोच तोचपणा येऊ नये ही अपेक्षा असते. याबाबत ज्ञानेश्वरांचे उदाहरण देता येईल. त्यांनी सूर्य वा चंद्राचा उपयोग विवचनासाठी एवढया विविध प्रकारांनी केलेला दिसतो की त्यामुळे त्याच्या प्रतिभेबद्दल अचंबा वाटतो.

निसर्गातून साहित्यिक "उपमाने" घेतात. रंग, रुप, आकार, प्रकार, ध्वनीनिनाद, गंधस्पर्श यांनी भरलेले वैविध्यपूर्ण सौंदर्य निसर्गात भरले आहे. मानव व निसर्गात अंतर्बाह्य समरुपता असल्याने मानव निसर्गाशी सतत साम्य शोधीत राहतो. मानवी रुप, गुण, भावातील साम्यातूनच अलंकार योजना केली जाते. तथापि ती सौंदर्यपूर्ण व समर्पकही असावी लागते. त्यातून भावोत्कर्षाबरोबर रुप, गुण, क्रिया यांची तीव्र अनुभुतीही यावी लागते. उदा. स्त्रीच्या बाहूस वेलीची उपमा देताना समर्पकते बरोबर नाजूक भाव निर्मिती क्षमताही असावी लागते. उपमेय व उपमानात तोच तोचपणा असला तरी त्यांच्या सौंदर्य लक्षणांचा वा भिन्न परिस्थितीतील त्यांच्या विभिन्न रुपांचा योग्य उपयोग केल्यास त्यात पुनरावृत्तीचा दोष टाळता येतो. अलंकाराच्या सहाय्याने व्यक्तीचे प्रभावीचित्रण तर होतेच पण अव्यक्ताचे मूर्तीकरण वा "अरुपाचे रुप" दाखवताना ते विशेष उपयुक्त ठरतात. कित्येकदा निसर्गाचा "प्रतिक" म्हणूनही वापर केला जातो. सृष्टीतील कित्येक गोष्टी कोणत्या तरी विशिष्ट भावनेचे प्रतिक वा दयोतक म्हणून वापरल्या जातात. उदा. हंस हे न्यायाचे, समुद्र हे गांभिर्याचे प्रतिक मानतात.

मात्र सुंदर अलंकरण कौशल्यासाठी निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण, निसर्ग विषयक जिव्हाळा कविपाशी असायला हवा. अन्यथा अलंकाराच्या अवाजवी

हव्यासापायी कवी कलेपेक्षा शाब्दिक कसरतच अधिक करत बसतो. त्यासाठी कविला निसर्गाचा निकट सहवास हवा.

येथपर्यंत आपण काव्यात येणा-या निसर्ग चित्रणाच्या विविध प्रकारांचा विचार केला. तथापि हे प्रकार अचूक आहेत असा दुराग्रह आपणास करता येत नाही कारण या प्रकारांच्या वर्गीकरणात काही अडचणीही आहेत. [ या अडचणींचा सविस्तर विचार येथे विस्तारभयास्तव केलेला नाही ] मात्र साहित्याभ्यासकारांच्या दृष्टिकोनातून सोईचे ठरतील असे प्रकार पाडून त्यांच्या गुणधर्मानुसार त्यांचे वर्गीकरण केले आहे. आणखी एक महत्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे साहित्यात येणा-या निसर्गाला त्या साहित्य-प्रकारानुसार काही मर्यादा पडतात. कादंब-यात निसर्गाला भरपूर वाव असतो पण कथेत त्याच्या चित्रणास मर्यादा पडतात. भावगीतात तो मोठ्या प्रमाणात आला तरी भाष्य वा तात्त्विक ग्रंथात मात्र तो विशिष्ट मर्यादेतच येत असतो. अर्थात या मर्यादांचा अभ्यास हा एक स्वतंत्र अभ्यासविषय होऊ शकेल. त्याच्या अधिक खोलात शिरणे आपणास अपेक्षित नाही कारण त्यात विषयांतराचा दोष येईल.

प्राचीन साहित्यातील निसर्गाचा विचार करताना एक महत्वाची गोष्ट पहावी लागते ती म्हणजे प्राचीन काळात हा निसर्ग आला तो नेमक्या कोणत्या प्रयोजनासाठी ? त्याला नेमकी कोणती बैठक या लोकांनी दिली होती ? नैतिक, धार्मिक, तात्त्विक, सामाजिक की निखळ कलात्मक अधिष्ठान प्राचीन काळी या निसर्गास दिले गेले ? त्याच्या चित्रणातून तत्कालीन लोकांना नेमके काय अभिप्रेत होते ? काय साधावयाचे होते ? तत्कालीन लोकांना निसर्ग कोणत्या भूमिकेतून साकारायचा होता ? याही गोष्टी पाहणे क्रमप्राप्त ठरते.

## निसर्गाचे धार्मिक अधिष्ठान -

प्राचीन काळी आर्यांनी निसर्गाला धार्मिक बैठक दिली. धर्माच्या पायावर निसर्गचित्रणाचे स्वरूप साकारले. पंचमहाभूतांना देवतांचे स्थान देऊन पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांच्यात देवतांची वाटणी केली. निसर्गाच्या विराट रूपाबद्दल त्याला औत्सुक्य होतेच. पण त्याबरोबरच एक अनामिक भीतीही होती. या भयापोटीच त्यांनी निसर्गालाच देवपण देऊन टाकले. सृष्टीत घडणा-या प्रत्येक घटनेची त्यांनी धर्माशी सांगड घातली. धार्मिक अर्थ लावला. त्यांनी "ऋत्" नामक तत्त्वाला महत्त्व दिले. निसर्ग व्यापारांच्या मागे असलेली एक निश्चित व्यवस्था म्हणजे ऋतु समजून करुणास ऋतुराज मानले. निसर्गातील या सुसंगतीमागे आर्यांचा धार्मिक दृष्टिकोन दिसतो.

वृत्र म्हणजे मेघ, आदिती-आकाश, इंद्रवृययुध्द म्हणजे पर्जन्यकालावर शरद ऋतुने मिळवलेला विजय, पेव अकूराचे युध्द म्हणजे हिवाळ्यावरील वसंताचा विजय, सायली म्हणजे फुलपाखरू, जिमीटर म्हणजे वासंतिक धान्य समृध्दी अशी अनेक रूपके यात दिसतात.

आर्यांनी ऋग्वेदात पृथ्वीला देवता मानुन "अनेक उंच उंच वस्तुंनी युक्त, पर्वतभार सहणारी, अरण्यातील वृक्षांना आधार देणारी मही [मोठी] दृढा व अर्जुनी [प्रकाशमान]" असे म्हटले आहे.[१]

याप्रमाणे नदया, पर्जन्य, आप [जल], उषा, वायु, मरुत, सविता, सूर्य याही निसर्गातील घटकांना आर्यांनी देवत्व दिले असून या प्रत्येक देव-देवतांची स्वतंत्र स्तुतीसूक्ते ऋग्वेदात दिली आहेत.[२]

---

१. श्री. व्यं. केतकर - महाराष्ट्रीय ज्ञानकोश - वेदविदया भागर -प्रकरण १२ पान ३३७.

२. कित्ता - वेदकालीन इतिहास - दैवतेतिहास.

प्राचीन काळी तुफानी वादळे, धुवांधार पाऊस, अग्नी ओकणारा सूर्य, विजांचे विराट तांडव या सर्व निसर्गाच्या भीषण रुपांचा अनुभव मानवाने घेतला होता. निसर्गाच्या रम्य रुपासंबंधी त्याला आदर होता. तितकीच या भीषण रुपाबद्दल त्याच्या मनात अनामिक भीती होती. किंबहुना या सादर भीतीपोटीच त्याने निसर्गाला देवत्व प्रदान केले असावे. निसर्गातील हरेक घटकात त्याने परमेश्वरी रुप पाहून सश्रध्द मनाने या निसर्गाच्या सानुग्रह कृपेची अभिलाषा केली असावी. कदाचित याच हेतूने त्यांनी निसर्गाशी एवढी जवळीक साधली असावी. निसर्गाला त्याची स्तुती करुन प्रसन्न करुन घेण्याचा प्रयत्न केलेला असावा. आर्यांच्या नंतरही या निसर्ग देवतेचे महत्त्व कमी झालेले दिसत नाही. कोणत्याहि धार्मिक विधीपूर्वी या सर्व निसर्ग देवतांचे यथाइष्ट पूजन करण्याची प्रथा आजही प्रचलित आहे. यावरुन निसर्गाचे धार्मिक अधिष्ठान अजून कमी झाले नाही हे दिसते. तथापि कालांतराने निसर्गाचे दैनिक रुप चितारण्यापेक्षा नेत्राला दिसणारे, अनुभवास येणारे, सहज सुंदर भौतिक रुपच साहित्यात चितारले जाउ लागले.

## निसर्गाचे तात्त्विक अधिष्ठान किंवा निसर्ग व तत्वज्ञान -

आपल्या धर्माचे तत्वज्ञान प्रतिपादन करण्यासाठी मानवाने या निसर्गाचाच आश्रय घेतला. या निसर्गातील विविध गोष्टींना, घटनांना, तात्त्विक स्वरुप देऊन त्या घडामोडीतून तत्त्व प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला. याचा पाया सर्वप्रथम ऋग्वेदात दिसतो. ऋग्वेदात स्वतंत्र देवतांबरोबरच काही देवतायुग्म मानली गेली. अशा जवळ जवळ बारा जोडदेवता ऋग्वेदात आल्या आहेत. इंद्राग्नी, इंद्रवरुण, इंद्रवायू, दयावापृथ्वी, इंद्रासोमा, इंद्राबृहस्पती, इंद्राविष्णू, इंद्रापूषणा, सोमापूषणा, सोमारुद्रा, अग्नीसोमा, इंद्रापर्वता, इंद्रामरुता, अग्नीपर्जन्या, पर्जन्यवाता, नक्तोपासा, सूर्यचंद्रमसा अशा देवतांच्या जोडया म्हणजे अद्वैत तत्वज्ञानाचे बीजारोपणच होय.

असे म्हटले जाते. याच्यापुढील पायरी म्हणजे अद्वैत विचार. अद्वैताचा सखोल विचार पुढे उपनिषदात केला गेला. येथेही या निसर्गाच्या रुपातूनच परमतत्वाचा शोध घेत घेत अद्वैत तत्वज्ञानापर्यंत मनुष्य पोहोचला. अनेक रुपात विखुरलेल्या या निसर्गशक्तीच्या ठिकाणी एकच एक समर्थ समष्टी-शक्ती असावी असे त्याला जाणवले, या जिज्ञासेतुनच परमतत्वाचा शोध घेण्यास त्याने आरंभ केला.

तात्त्विक बैठकीवर निसर्गाचा विचार झाला तो अनेक प्रकारांनी पण यातही तीन दृष्टिकोन अधिक मूलगामी व महत्वपूर्ण ठरले.

अ] ब्रह्माचे प्रतिबिंब वा अनुकृती म्हणून निसर्गाचा विचार -

निसर्ग म्हणजे ब्रम्हाचे प्रतिबिंबच आहे. हे जगत् विश्व ब्रम्हाला जाणण्याचे एक साधन असून या प्रतिबिंबावरुन मूळ बिंबाचा शोध घ्यायचा. अनुकृतीवरुन मूळ कृतीची ओळख करुन घ्यायची असे तत्त्व मांडले गेले. "यूनानी" "तत्वज्ञ" प्लेटो" यानेही याच तत्वाचा पाठपुरावा केला.

ब] ब्रम्हाची अभिव्यक्ती वा चिद्विलास -

निसर्गाला यात ब्रम्हाची अभिव्यक्ती मानले गेले. अणुरेणू, चराचरात ब्रम्ह भरलेले आहे असे तत्वज्ञांनी मानले. एकाच सर्वव्याप्त चैतन्याने निसर्ग नटलेला आहे असे मानून या दार्शनिक या निसर्गावर लुब्ध होतात.

"एकही तो असीम उल्लास, विश्वमें पाता विविधाभास I
तरल जलविधीमें हरितविलास, शांत अंबरमें नील विकास II"

या काव्यपंक्ती हेच सांगतात.

ज्ञानेशांनीही आपल्या तत्वज्ञानात चिद्विलासवादालाच अधिक प्राधान्य देऊन हा निसर्ग ही "बहुविधा सृष्टी" म्हणजे त्या सर्वव्यापी परमात्म्याचा विलासच आहे असे प्रतिपादले. याचा सविस्तर विचार पुढे करावयाचा आहेच.

क] मायावाद -

शंकराचार्यांनी द्वैताचा स्वीकार करून "ब्रह्मसत्य, जग मिथ्या" असे तत्व मांडले. ब्रम्ह हेच एकमेव सत्य असून बाकी सर्व जग अर्थात हे चराचर, हा निसर्ग मिथ्य आहे, खोटा आहे असे प्रतिपादले. काही अभ्यासकांच्या मते शंकराचार्यांनी जगाला मिथ्य कल्पून सजीव सृष्टीचे अस्तित्वच नाकारले व निसर्गाचे अस्तित्व स्पष्टपणे जाणवत असता ते नाकारणे योग्य ठरते का ? असा मुद्दा उपस्थित केला आहे. अर्थात यावरील वादविवाद, खंडनमंडन हा तूर्त तरी आपल्या अभ्यासाचा विषय नाही.

एकंदरीत निसर्गाने मानवाला तत्वज्ञ बनवले. त्याच्या भव्यानुपम सुंदर व अनंत रुपातच परमतत्वाची महत्त्वपूर्ण जाणीव मानवास झाली. निसर्गाचे हे उपकार मानवास नाकारता येतच नाहीत.

## तत्वज्ञान व प्रतिमा -

मानवाने या निसर्गातून निसर्गाच्या सहाय्याने तत्वज्ञान मांडले खरे पण या तत्वज्ञानाच्या प्रतिपादनासाठीही त्याला या निसर्गाचाच आश्रय करावा लागला. या निसर्गातील विविध वस्तू, प्रतिमा त्याला दृष्टांता-दाखल दयाव्या लागल्या. किंबहुना हे तत्व प्रतिपादन व तत्वार्थ विवेचन करताना निसर्गातील वस्तू, घटनांचे वैविध्यपूर्ण दाखले त्याला दयावे लागले. त्यासाठी निसर्ग प्रतिमांचेच उपयोजन करणे भाग पडले.

या निसर्गातल्या विराट शक्तीचा शोध घेता घेता जी काही तत्वे, सिध्दांत, मानवास ज्ञानीभूत झाले ती तत्वे सामान्य माणसांना समजून देणेही तितकेच गरजेचे होते. आपले तत्वज्ञान आपणापुरतेच मर्यादित न राहता अन्य लोकांनाही त्याचा लाभ घेता यावा त्याचे ज्ञान व्हावे यासाठी ते सुलभ भाषेत मांडणे क्रमप्राप्त झाले. या सुलभीकरणाच्या प्रक्रियेत तत्वज्ञानी लोकांना

ब-याचदा निसर्गातील वस्तूच्याच उपमा, दृष्टांत, प्रतिमा देण्याची आवश्यकता भासली व यातूनच विविध प्रकारच्या निसर्गप्रतिमा साकार झाल्या.

एखादया नवशिक्या बालकास बोट धरून आईपाशी नेऊन सोडावे तद्वत वाचकांना तत्वज्ञानाच्या गाभ्यापर्यंत अलगद नेऊन सोडण्याचे काम या प्रतिमांनी केले. ख-या अर्थाने निसर्गाच्या कुशीतून मोहक प्रतिमासृष्टी प्रसवली ती ज्ञानेश्वरांचीच । त्यांच्या निसर्गप्रतिमांचा अनमोल खजिना खरोखर लुब्ध करतो. एकेक निसर्गप्रतिमा म्हणजे जणू एकेक बहुमोल रत्नच ठरते व या रत्नतुल्य प्रतिमांनी जडवलेली ही ज्ञानेश्वरी म्हणजे सरस्वतीच्या मस्तकावरचा रत्नजडित मुगुट ठरतो.

निसर्गाच्या दिव्यानुभवी सहवासातुन तत्वज्ञानाची निर्मिती व तत्वज्ञानार्थ प्रतिपादन सुलभतेच्या आवश्यकतेतुन प्रतिमा, दृष्टांताच्या विश्वासा प्रसव ही एक अतुट साखळीच आहे. तत्वज्ञान्याच्या अमृतवाणीच्या अमोघ प्रवाहातली दुर्गम वळणे पार करण्याच्या कामी या "प्रतिमा, उपमा, दृष्टांताचा उपयोग एखादया दिपशिखे प्रमाणे होतो. किंबहुना तत्वज्ञानातल्या दुर्बोध स्थळी या प्रतिमा मार्गप्रदीपाचे कार्य करतात. म्हणूनच "प्रतिमेचे" महत्व नाकारता येत नाही. एवढेच नव्हे तर प्रतिमादिंचो काही हातात घेतल्याविना तत्वज्ञानाची दुर्गम गिरीशिखरे चढणे कठिण होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

## ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद व निसर्ग -

ज्ञानेशांनी प्रामुख्याने अद्वैताचा स्वीकार केला. "स्त्रीपुरुष नाम भेदे । शिवपण एकले नांदे ।।"[१] असे ते अमृतानुभवात सांगतात. हे विश्व म्हणजे स्वतंत्र वस्तू नसून हा परमात्म्याचा विलास आहे. प्रकृति व पुरुष ही दोन्ही तत्वे दोन वाटत असली तरी प्रत्यक्षात मात्र "अनादि एकपणे नांदती दोघे"[२]

---

१. ज्ञानेश्वर - "अमृतानुभव" ओवी १७
२. कित्ता - ओवी क्र. ८

अशी एकरूपता त्यांच्यात आहे. किंबहुना पुरुष व प्रकृती ही दोघेही एकाच ब्रम्हाच्या चित्प्रकाशाने प्रकाशली आहेत. सृष्टीच्या रुपात त्या सत्‌चिदानंद-रुपी ब्रम्हाने केलेल्या विलासासच ज्ञानेश्वर चिद्‌विलास असे संबोधतात. या सृष्टीला ते प्रतिबिंबाची उपमा देतात. बिंब प्रतिबिंबात प्रतिबिंबापेक्षा मूळ बिंब महत्वाचे असते. अशाच अर्थाचे ते प्रतिपादन करतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी चिद्‌विलासवादासंबंधी म्हणतात, "हा चिद्‌विलासवाद म्हणजे मायावादासहीत अद्वैत सिध्दांत मान्य करणे होय. चिद्‌विलासवादामुळे कर्मयोग, भक्तीयोग, चैतन्यलीलेत अंतर्भूत होतात. "[१]

ज्ञानेशांचा चिद्‌विलासवाद म्हणजे आत्मसाक्षात्कारवाद किंवा परतत्व-स्पर्शवाद होय. या तत्वज्ञानाची मध्यवर्ती कल्पना "आत्म्याचे स्फुरण" ही आहे. आत्मा व परमात्म्याचे अद्वैत पाहून आत्म्याच्या सत्तेने देह स्फुरत असतो, आत्मा हा सत्य, शुध्द, निरुपाधिक आनंद स्वरुप आहे. हाच आत्मा शिवापासून चराचर वस्तूमात्रात स्फुरत आहे असेही ज्ञानदेवांनी सांगितले. अतिंद्रीय अशा तत्वाचा साक्षात्कार आत्म्याला होतो त्याने मन भारुन जाते. त्या आदितत्वाची जाणीव होते यालाच "आत्मसाक्षात्कार" असे म्हणता येईल. दृश्य सौंदर्याच्या द्वारे कलावंताला, साधकाला अतिंद्रिय तत्वाचे ज्ञान होते म्हणजे चराचरात स्फुरणा-या आत्मतत्वाचेच ज्ञान होते. हा साक्षात्कार अलौकिक सौंदर्याचा असतो. "सळसळणारे, रसरसणारे जीवनचैतन्य हेच सत्य आहे, तेच सौंदर्य आहे, तेच आनंदतत्व आहे. तो प्रभू आहे. हे सारे विश्व हा अवघा संसार ही त्याचीच लीला आहे. हा त्याचा विलास आहे. सत्य केवळ स्थिर नाही, ते गतीमान [*dynamic* ] आहे, त्याला विलासा-वाचून चैन पडत नाही"[२] असे रविंद्रनाथ जेव्हा म्हणतात तेव्हा मानवी

---

१. डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे -"महाराष्ट्र जीवन भाग २, १९६०"- तत्वमिमांसा आंग्लपूर्व ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार" प्रकरण २ पान १४.

२. डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे - "ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार प्रकरण २ पान १८.

जीवनाहून निसर्गाचे अस्तित्व त्यांना भिन्न वाटत नाही. तद्वत ज्ञानेशांनीही चराचरात, सर्व वस्तुमात्रात, प्राणीमात्रात, या निसर्गात परमात्म्याहून वेगळे काही पाहिले नाही. परमात्मा म्हणजेच हा निसर्ग, हे चराचर, हे विश्व याची त्यांना सतत जाणीव आहे व ते ती वाचकांना करून देतात. ज्ञानेशांची निसर्गाकडे पाहण्याची ही दृष्टी इतरांपेक्षा निश्चितच भिन्न आहे. या विश्वात चैतन्याचे स्वरुप शोधताना त्यांना निसर्गाचा विसर पडलेला नाही. उलट ते निसर्गाला परतत्वाची योग्यताच प्राप्त करून देतात. ज्ञानेशांनी निसर्गाला कुठेच कमीपणा दिलेला नाही. सृष्टीतल्या हरेक गोष्टीबद्दल त्यांना नितांत आदर प्रेम व भक्ती आहे. त्यांच्या चिद्विलासा संबंधात सौ. पद्मा कुलकर्णी यांनी "ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान" या ग्रंथात केलेले विवेचन देखिल या अभ्यासास उपयुक्त ठरते. तथापि आपणास ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा निसर्गप्रीतीशी संबंध जोडावयाचा आहे. तत्वज्ञानातुन त्यांचा दिसणारा निसर्गविषयक दृष्टिकोन व त्यांनी वापरलेल्या निसर्ग प्रतिमा यांचा आपणास अधिक विचार करावयाचा आहे.

ज्ञानेशांचे निसर्गप्रेम, निसर्गाविषयीची त्यांची भावना, त्यांचा व्यापक दृष्टिकोन, त्यांच्या निसर्गचित्रणात येणारे परतत्व स्पर्शित्व या गोष्टी आपणास प्रामुख्याने पहायच्या आहेत. त्यांचे तत्वज्ञान, तत्वज्ञानात आलेला निसर्ग, निसर्गातुन त्यांना सापडलेली अध्यात्मिक तत्वे व त्यांच्या परस्पर स्पष्टीकरणार्थ त्यांनी वापरलेल्या निसर्गप्रतिमांचा अभ्यास आपणास अधिक अपेक्षित आहे. आपल्या काव्यात ज्ञानेशांनी निसर्ग व तत्वज्ञानाची चपखल सांगड घातली आहे. अर्थात ज्ञानेशांनी मायावाद सांगितला की चिद्विलासवाद यावर ब-याच अभ्यासकांनी सर्व शक्तीनिशी भरपूर काथ्याकूट केलेला आहे. यातल्या एकाही शब्दपंडिताने आपला वाद बाजूला सारून त्यात भरलेला सौंदर्यविलास अनुभवलेला नाही हे त्यांचे दुर्दैव म्हणावे लागेल. त्यांच्या लेखणीतून पाझरणारा अमृतनिर्झर, साहित्यसोन्याच्या खाणी, भावार्थाचे गिरीवर, विवेकवेलीची घनदाट लावणी या गोष्टी शब्द पाखंडी

अभ्यासकांनी पाहिलेल्या दिसत नाहीत. ज्ञानेशांचा चिद्विलासवाद हा एका अर्थाने निसर्गवाद ठरतो. आपल्या विवेचनातून त्यांनी निसर्गाला अलौकिकत्व प्राप्त करुन दिले आहे हे नक्की.

## समारोप -

प्रस्तुत प्रकरणात आपण निसर्ग मानव संबंध, दोघांचे परस्परावलंबित्व, साहित्यांतर्गत निसर्गाची विविध रुपे, निसर्गाचे धार्मिक व तात्त्विक अधिष्ठान, ज्ञानेशांचा चिद्विलासवाद व निसर्ग या सर्वांचा विस्तृत व चर्चात्मक आढावा घेतला. साहित्यातले निसर्गचित्रण किती अपरिहार्य असते किंबहुना निसर्गचित्रण हे साहित्याचे एक महत्वपूर्ण अंग असते याची आपणास कल्पना आली. मानवी जीवनात निसर्गाचे स्थान किती अर्थपूर्ण असते हेही समजले. एवढेच नव्हे तर हा निसर्ग मानवी गरजापूर्ततेपुरता मर्यादित नसून मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर त्याची तत्वज्ञान, धर्म यांच्याशीही किती चपखल सांगड घातली याची जाणीव होते. या निसर्गाशी त्याने निकटचे भावनिक नातेही प्रस्थापित करुन, आपल्या कलासाधनेत त्याला सहभागी करुन घेतलेले आहे.

काव्यादी साहित्यात तर हा निसर्ग अविभाज्य, अपरिहार्य अंग होऊन गेला आहे. ज्ञानेश्वरादि संत कवींनीही आपल्या तत्वार्थ प्रतिपादन सौकर्यास्तव या निसर्गातील विविध प्रतिमांचीच मदत घेतली आहे. निसर्गाचे हे सहकार्य पाहता निसर्ग हा केवळ मानवाचा सखा नसून मानवी जीवनाचे प्राणतत्वच बनुन गेला आहे हे मान्य करावेच लागते.

साहित्य, काव्य व निसर्गातील हे सहसंबंध अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय ठरण्याइतपत व्यापक आहेत. या सर्वांचा आपण या प्रकरणात विस्तार-मर्यादेचे भान ठेवून विचार केला आहे.

अनादि कालापासून निसर्गाचा काव्यात होणारा वापर तितक्याच अपरिहार्यपणे आजही केला जात आहे. त्याचे कलात्मक मूल्य वा महत्व कमी

न होता वाढतच राहिले आहे. किंबहुना निसर्गचित्रणाला वा निसर्गप्रतिमांना नवकाव्यात अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

थोडक्यात प्रस्तुत प्रकरणातून आपणास काही ठळक निष्कर्ष दिसून येतात.

१] निसर्ग व मानव यांचा पुरातन कालापासून जवळिकीचा संबंध आहे.

२] हा संबंध भिन्नभिन्न स्वरुपात प्रस्थापित केला जातो.

३] मानव आपल्या भावभावनात कित्येकदा निसर्गाला सहभागी करुन घेत असतो.

४] साहित्यात निसर्गचित्रण अपरिहार्य असते.

५] साहित्यिक व निसर्ग यांच्यात एका वेगळ्या पातळीवरचे नाते असते.

६] सामान्य माणसे व साहित्यिक यांच्या निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बराच फरक असतो.

७] साहित्यांतर्गत निसर्गचित्रणाचे वेगवेगळे प्रकार आहेत तसा त्यांना मर्यादाही आहेत.

८] निसर्गाला तत्वज्ञान, धर्म व कला अशी तिहेरी बैठक लाभलेली आहे.

९] तत्वज्ञानाच्या सुलभ प्रतिपादनासाठी ब-याचदा निसर्गप्रतिमांचा वापर केला जातो.

१०] ज्ञानेशांच्या चिद्‌विलासवादाची बैठकही निसर्गावरच आधारित आहे.

उपरोक्त निष्कर्षावलोकनानंतर आपणास या शोधनिबंधाच्या तिस-या प्रकरणाकडे वाटचाल करावयाची आहे. त्या प्रकरणात आपल्या विषयाचे केंद्रबिंदू असलेल्या ज्ञानदेवांच्या दुहेरी व्यक्तित्वाचे दर्शन, त्यांची निसर्गविषय दृष्टी, त्यांची ग्रंथसंपदा या ब-याच गोष्टींचा विचार करावयाचा आहे. किंबहुना या तिन्ही प्रकरणांच्या पायावर आपल्या शोधनिबंधाची उभारणी करावयाची आहे. त्या दृष्टिने पहिली तिनही प्रकरणे चौथ्या व महत्वाच्या प्रकरणाच्या विषयप्रवेशाच्या प्रमुख पाय-या आहेत असे म्हणण्यास हरकत नाही.

## - संदर्भग्रंथ -


१] गुप्ता किरणकुमारी - "हिंदी काव्यमें प्रकृति चित्रण"

२] हुपरीकर ग. श्री. - "तत्वज्ञ कवी श्री ज्ञानेश्वर - श्री ज्ञानेश्वर दर्शन"
भाग १ पान २८५

३] जोग रा. श्री. - "केशवसुत"

४] केळकर र. के. - "काव्यालोचन"

५] केतकर श्री. त्र्यं. - "महाराष्ट्रीय ज्ञानकोश वेदविद्या" - भाग २

६] ज्ञानेश्वर - "सार्थ अमृतानुभव"

७] सहस्त्रबुध्दे अनिल - "ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार"

८] "महाराष्ट्र जीवन" - भाग-२, १९६० तत्वमिमांसा, आंग्लपूर्व.

९] डॉ. कुलकर्णी वि. ना. - "मराठी साहित्यातील निसर्ग" -
पी. एच्. डी. प्रबंध